सातारा, गुरुवार, १९ नोव्हेंबर २०१५ । किंमत ₹ ४

सकाळ

सातारा TODAY

सकाळ
सातारा, गुरुवार,
१९ नोव्हेंबर २०१५
३

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# कोल्हापूरच्या न्यू कॉलेजला विजेतेपद

## कोरेगावात शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी क्रीडा स्पर्धा ; पाटील सर्वोत्कृष्ट खेळाडू

**पळशी, ता. १८ :** शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत सांघिक गटात कोल्हापूरच्या न्यू कॉलेजने विजेतेपद मिळविले. गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाने दुसरा, सांगलीच्या 'विलिंग्डन'ने तिसरा क्रमांक मिळवला. वैयक्तिक गटात विटा येथील बळवंत महाविद्यालयाच्या भैरवनाथ पाटील याने पुरुष गटात व कुरुकलीच्या 'भोगावती'मधील उज्ज्वला पाटील हिने महिला गटात उत्कृष्ट खेळाडूचा मान मिळवला.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी क्रीडा स्पर्धा नुकत्याच झाल्या. स्पर्धेत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ७७ महाविद्यालयांतील स्पर्धकांनी भाग घेतला. विटा येथील बळवंत महाविद्यालयाने चौथा, कुरुकलीच्या 'भोगावती'ने पाचवा, कोरेगावच्या 'डीपी'ने सहावा क्रमांक मिळवला.

जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा नुकताच समारोप झाला.



**कोरेगाव : आंतरविभागीय मैदानी स्पर्धेतील विजेतेपदाची ढाल डॉ. अभिनव देशमुख यांच्या हस्ते स्वीकारताना कोल्हापूरच्या न्यू कॉलेजचे खेळाडू. त्या वेळी एस. के. पाटील, डॉ. विजयसिंह सावंत.**

अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य प्राचार्य एस. के. पाटील होते. प्रथितयश खेळाडूंना शासनाच्या सरळ सेवेत समाविष्ट करून घेतले जात असल्याचे नमूद करून डॉ. देशमुख म्हणाले, "विद्यार्थ्यांनी कला व कौशल्य आत्मसात करून घ्यावे. प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवल्यास निश्चितपणे यश मिळते. या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धक राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेपर्यंत पोचतील आणि उल्लेखनीय कामगिरी दाखवतील." विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीसाठी हे महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्राचार्य पाटील यांनी सांगितले. स्पर्धा निवड समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रकाश गायकवाड यांचेही भाषण झाले. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. देशमुख व प्राचार्य पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. पद्मिनी मोकाशी, प्रदीप पवार, संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. उमाकांत मुळे यांनी आभार मानले. ज्ञानदेव भोसले, श्रीरंग भोसले, प्रा. शोभा पाटील, गणेश सिंहासने, राम पाटील, दीपक डांगे-पाटील, समन्वयक बाळकृष्ण पाटील, सहसमन्वयक अरुण पाटील, अशोक चव्हाण, संभाजी पाटील उपस्थित होते.